RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६७ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२८ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नाशिकमध्ये जानेवारीत राष्ट्रीय युवा महोत्सव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

केंद्र सरकारच्या युवक आणि क्रीडा मंत्रालयातर्फे २७वा राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्रावर सोपवण्यात आली आहे. त्यानुसार १२ ते १६ जानेवारी या कालावधीत नाशिक येथे होणाऱ्या या महोत्सवात देशभरातील युवक सहभागी होणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.



शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. युवकांचा सर्वांगिण विकास, संस्कृती आणि परंपरांचे जतन, युवकांच्या सुप्त गुणांना वाव देणे, राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे या उद्देशाने राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात येतो. राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील युवांचा चमू, राष्ट्रीय सेवा योजना, नेहरू युवा केंद्र संघटना यांचे स्वयंसेवक, परीक्षक, अधिकारी, कर्मचारी असे एकूण आठ हजार जण महोत्सवात सहभागी होणार आहेत. या महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.महोत्सवाच्या आयोजनासाठीची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तर समिती, राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तर कार्यकारी समिती, नाशिकच्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आयोजन समिती, तर क्रीडा आणि युवक कल्याण विभागाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे.

### पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यासाठी केंद्रीय पथक उद्या नाशिकमध्ये

पथकाकडून या जागांची पाहणी केली जाणार असल्याचे समजते. नियोजित हेलिपॅडची जागा तसेच सभेच्या जागेची निश्चिती गुरुवारी होण्याची शक्यता आहे. नेहरू युवा केंद्राच्या वतीने दरवर्षी युवा दिनानिमित्त देशभरात विविध ठिकाणी कार्यक्रम घेतले जातात. यंदा १२ जानेवारी युवा दिनाचा हा मेळावा नाशिकमध्ये निश्चित करण्यात आला आहे. या दौऱ्यासाठी यंत्रणेने तयारी सुरू केली असतांनाच आता केंद्रीय पथकदेखील दाखल होणार असल्याने पथकाच्या निर्देशानुसार नियोजनाला दिशा मिळणार आहे. त्यामुळे या पथकाचा हा दौरादेखील निश्चित मानला जात आहे. पंतप्रधान मोदी यांचा दौरा हा निश्चित मानला जात असल्याने राज्यभरातून किती युवक येतील, त्यानुसार कार्यक्रमाचे नियोजन करावे लागणार आहे. शहराच्या बाहेरचे मैदान आणि हॅलिपॅड याचे नियोजन असून शक्यतो रस्ते मागे अंतर कमीत कमी असावे, असे नियोजन केले जाणार असल्याचे समजते.

## दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा; महाराष्ट्रासह तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशातून कार्यकर्ते नागपुरात

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

काँग्रेसच्या १३९ व्या राष्ट्रीय अधिवेशनानिमित्त राज्याचे काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उमरेड मार्गावरून मैदानावर येत आहोत. मात्र वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन न केल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. दिघोरी चौकापासून किमान दोन किलोमीटरपर्यंत गाड्यांच्या रांगा लागल्या आहेत.



काँग्रेस पक्षाच्या १३८ व्या स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित जाहीर सभेची जय्यत तयारी पक्षाने केली असून या सभेद्वारे आगामी निवडणुका लक्षात घेऊन 'शक्तिप्रदर्शन' केले जात आहे. मात्र या सभेसाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे सभेला येणाऱ्यांची कोंडी होत आहे. तसेच उमरेड मार्गाने पुढे जाणाऱ्यांची अडचण होत आहे. रस्त्यावर लोक मिळेल त्या जागेवर गाड्या लावत आहेत, कुठेही वाहनतळ बनवलेले नसल्याने संपूर्ण रस्ते जाम झालेले आहेत.या सभेत तीन मोठ्या व्यासपीठावर पाचशेहून अधिक नेते, मुख्यमंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी विराजमान होणार आहेत. महाराष्ट्रासह तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश या शेजारच्या राज्यातून कार्यकर्ते, नागरिकांना एकत्र आणून मोठे शक्तिप्रदर्शन काँग्रेस करणार आहे.काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पक्षाच्या क्राउडफंडिंग मोहिमेची सुरुवात केली आणि लोकांना बेरोजगारी आणि वाढत्या खर्चाविरूद्धच्या लढ्यात सामील होण्यास सांगितले.

## तयारीला लागा! मनोज जरांगेंनी जाहीर केला मराठा आरक्षण दिंडीचा मार्ग

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक छत्रपती संभाजीनगर**

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्या या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारी रोजी लाखो समाजबांधवांसह मुंबईला जाण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयानुसार आज त्यांनी मुंबईला जाण्याचा रूट(मार्ग) त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. समाजबांधवांनी दररोज लागणाऱ्या खाण्यापिण्याच्या साहित्यासह मराठा आरक्षण दिंडीत सहभागी होण्यासाठी तयारी सुरू करावी, असे आवाहन त्यांनी केले.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाज आंदोलन करीत आहेत. मराठा समाजाला टीकणारे आरक्षण देण्यासाठी राज्यसरकारने दिलेली २४ डिसेंबरची मुदत संपल्याने मनोज जरांगे पाटील यांनी कोट्यवधी समाजबांधवासह मुंबईला जाण्याची घोषणा केली. गुरूवारी त्यांनी शहरातील खाजगी रुग्णालयात पत्रकारांशी



बोलताना मुंबईला जाण्याचा मार्ग कसा असेल, याविषयी सविस्तर माहिती दिली.

ते म्हणाले की, २० जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता अंतरवाली सराटी(जि. जालना)येथून मुंबईला जाण्याचा प्रवास सुरू होईल. तेथून शहागड, गेवराई (जि. बीड), पाडळसिंग, अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश करून पाथर्डी, तीसगाव, करंजी फाटा मार्गे अहमदनगर, केडगाव, सूपा,शिरूर, शिक्रापूर मार्गे रांजणगाव मार्गे वाघोली, खराडी बायपास मार्गे, चंदननगर पुणे, लोणावळा, पनवेल, वाशी ,चेम्बुर मार्गे मुंबईतील आझाद मैदान असा मार्ग असेल.

प्रवासाला किती दिवस लागतील, याप्रश्नाचे उत्तर देताना जरांगे पाटील म्हणाले की, आम्हाला काही विशिष्ट तारखेस मुंबईला पोहचायचे नाही, यामुळे कितीही दिवस लागले तरी आम्ही मुंबईत जाणारच आहोत.

### सुमारे सव्वादोन लाख स्वयंसेवक

कोटयवधी समाजबांधव या मराठा आरक्षण पायी दिंडीत सहभागी होणार असल्याने कोणतीही गडबड होऊ नये, यासाठी सुमारे दोन ते सव्वा दोन लाख स्वयंसेवक यासाठी तैनात असतील. विविध तुकड्यांमध्ये हा लाँगमार्च असेल. शिवाय मुंबईतील आणि राज्यातील मराठा बांधवांनी गट,तट सोडून या आंदोलनात सहभाग नोंदविण्याचे आवाहन यावेळी जरांगे पाटील यांनी केले.

शिवाय प्रत्येक तुकडीच्या प्रमुखांनी आणि स्वयंसेवकांनी आपआपल्या तुकडीतील समाजबांधवाच्या जेवण, पाण्याची सोय करायची आहे. यासाठी एका वाहनातून मीठ,मिरची, तेल, ५० किलो बाजरी पीठ, ५० किलो गव्हाचे पीठ, ५० किलो तांदुळ, दाळी आणि छोटी चुल , पाण्याचे ड्रम, टँकर सोबत घ्यावी, जेथे रस्त्यात थांबाल तेथेच आपला स्वयंपाक करून खायचा आहे.

## ठाकरे गटाची २३ जागांची मागणी काँग्रेसने फेटाळली लोकसभेसाठी जागा वाटपाचा तिढा वाढणार?



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. या ४८ जागांचं विभाजन काँग्रेस, राष्ट्रवादी आणि ठाकरे गट अशा तीन पक्षांत करायचं आहे. परंतु, अनेक जागांवर तिन्ही पक्षांचे उमेदवार निवडणूक लढवू इच्छितात. त्यामुळे जागावाटपाचा मोठा तिढा निर्माण झाला आहे. राज्य पातळीवरील हे वाद राज्यांतर्गत सोडवले जावेत, असा निर्णय इंडिया आघाडीने घेतला आहे. तसंच, इतर अनेक पक्षही महाविकास आघाडीत येण्याची संधी शोधत आहेत. त्यामुळे कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात, याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. दरम्यान, जागा वाटपाबाबत ठाकरे गटाने मांडलेला प्रस्ताव काँग्रेसने फेटाळला असल्याचं वृत्त समोर येतंय. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

लोकसभा निवडणुकीकरता ठाकरे गटाने २३ जागांची मागणी केली होती. परंतु, काँग्रेसने ही मागणी अमान्य केली आहे. यासंदर्भात नुकतीस महाविकास आघाडीतील नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत ठाकरे गटाने २३ जागांची मागणी केली होती. परंतु, ही मागणी आता फेटाळून लावण्यात आली आहे.

शिवसेनेची दोन गटांत विभागणी झाली असून ठाकरे गटाने ४८ पैकी २३ जागांची मागणी केली होती. परंतु, त्यांच्यातील बरेच सदस्य एकनाथ शिंदे गटाकडे आहेत. त्यामुळे ठाकरे गटाकडे पुरेसे उमेदवार नसल्याने त्यांच्यापुढे मोठं आव्हान आहे, असं संजय निरुपम यांनी म्हटलं असल्याचं वृत्त इंडिया टुडेने दिलं. तसंच, महाविकास आघाडीतील नेत्यांनी जागावाटपाबाबत संघर्ष टाळावा. ठाकरे गट २३ जागांची मागणी करू शकतं. पण या जागांचं ते काय करणार? शिवसेनेतील अनेक नेते एकनाथ शिंदे गटात आहेत. त्यामुळे उमेदवारी देण्याबाबत ठाकरे गटातच मोठं आव्हान निर्माण झालं आहे, असंही निरूपम म्हणाले.

### २३ जागांची मागणी परिस्थितीनुसार नाही

महाविकास आघाडीतील शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडली आहे. त्यामुळे स्थिर मतांचा एकमेव जुना पक्ष आता काँग्रेस आहे, असं महाविकास आघाडीच्या बैठकीत काँग्रेस नेत्यांनी स्पष्ट केलं आहे. तर, माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण म्हणाले की, पक्षांमध्ये चर्चेची गरज आहे. प्रत्येक पक्षाला जास्त जागांची इच्छा असली तरी, शिवसेनेची २३ जागांची मागणी सध्याच्या परिस्थितीनुसार जास्त आहे.

## १० तारखेला काय घडणार?; राजकीय वर्तुळातील चर्चेवर विजय वडेट्टीवारांनी केला दावा



**दि.२८ विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

सत्तेतील आमदार बच्चू कडू यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर विविध चर्चेला उधाण आले आहे. त्यात राज्यात मुख्यमंत्री बदलाच्या काही घडामोडी घडतायेत का अशीही चर्चा आहे. मात्र या भेटीवरून काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मोठा दावा केला आहे.

विरोधी पक्षनेते म्हणाले की, इंडिया आघाडीत आले तर बच्चू कडूंचे स्वागत आहे. हायकमांडकडे चर्चा करून आणि चर्चेतून निर्णय घेऊ. सत्तेतून बच्चू कडू यांचा भ्रमनिराश झाला असावा. बच्चू कडूंचा कल असेल तर चर्चा होईल. राजकारणात जी भूमिका जो मांडतो त्यावर चर्चा होते. १० तारखेच्या निकालानंतर नवीन नवरदेव बोहल्यावर बसेल. मुख्यमंत्री बदलणार अशी चर्चा जोरात आहे. त्या चर्चेचा भाग म्हणून मी बोलतोय. त्यामुळे १० तारखेसाठी अनेकांनी बाशिंगे बांधून, ड्रेस तयार ठेवलाय. त्याची तयारी आता सुरू झाली. बच्चू कडू यांची भेट कदाचित त्यातूनच झाली असावी असं वाटतं असं त्यांनी म्हटलं.

तर अमरावतीतील वर्धा, अमरावती या लोकसभा मतदारसंघाबाबत शरद पवारांसोबत चर्चा झाली. ही चर्चा राजकीय नव्हती. भेट होती. एकनाथ शिंदे असेपर्यंत मी साथ सोडणार नाही. काही संकेत वैगेरे नाही. राजकीय चर्चा झाली नाही. शेतीवर चर्चा झाली. भेटीचं आमंत्रण स्वीकारले ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे. बऱ्याच गोष्टी उघड करायच्या नसत्या. तेवढे तारतम्य ठेवले पाहिजे. आकाशात अजून ढग आले नाही. ढग आल्यावर पाहू. सध्या खरे बोलले म्हणजे सत्तेविरोधात बोलले असं होते. जे खरे आहे ते सरकारविरोधातच असेल असा वेगळा अर्थ काढणे गरजेचे नाही. शेतकरी आमचा मायबाप आहे. नेत्यांची गुलामी होण्याची मानसिकता आमच्या डोक्यात येणार नाही. राजकीय प्रस्तावावर चर्चा झाली नाही. चर्चा झाली तर आमच्या पक्षाचे भले करू. आम्हाला २-३ दरवाजे उघडे आहेत. आम्ही जाणीव ठेवणारे लोक आहोत अशा शब्दात बच्चू कडू यांनी पवार भेटीवर भाष्य केले आहे.

## राज ठाकरे पुन्हा 'वर्षा'वर, मुख्यमंत्र्यांसोबत खलबतं

### नवी समीकरणं जुळवण्याचा प्रयत्न सुरू आहे का?अशी चर्चा राजकीय वर्तुळात

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा या निवासस्थानी भेट घेतली आहे. यावेळी राज यांच्यासोबत मनसे नेते आणि माजी आमदार बाळा नांदगावकर हेदेखील उपस्थित होते. राज ठाकरे यांनी मराठी पाट्या, टोलनाक्यांवर होणारी अतिरिक्त वसुली आणि बीडीडी चाळ अशा विविध मुद्द्यांवर मागील काही महिन्यांत अनेकदा मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली आहे. मात्र आजची भेट नेमक्या कोणत्या कारणासाठी झाली, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

राज ठाकरे हे विविध विकासकामांबाबत आपल्या सूचना मांडण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेत असतात.



मात्र अलीकडील काळात या दोन नेत्यांच्या भेटीगाठी मोठ्या प्रमाणात होत असल्याने यामागे आगामी निवडणुकांसाठी नवी समीकरणं जुळवण्याचा प्रयत्न असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. कारण उद्धव ठाकरे यांना आव्हान देत शिवसेनेत बंड केल्यानंतर एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांची जवळीक आणखीनच वाढली आहे. त्यामुळे या दोघांमधील मैत्रीपूर्ण संबंध निवडणुकीच्या आखाड्यातही दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

काही महिन्यांत लोकसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. तसंच नंतर राज्यात विधानसभा आण विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी रंगणार आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिका निवडणुकीचाही समावेश आहे. या निवडणुकांमध्ये राज ठाकरे यांची मनसे आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची युती झाल्यास दोन्ही पक्षांसाठी ते फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

## संपादकीय ......


# पर्यटनावर भविष्यात विपरीत परिणाम होण्याची शक्यता

गेल्या चार दिवसांपासून मोठ्या शहरांतून पर्यटक कोकणासह महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी पर्यटनासाठी बाहेर पडत असून स्वाभाविकच वाहनांची कोंडी होण्याचे प्रकार दररोज कुठे ना कुठे अनुभवायला येत आहेत. ठप्प होणार्या वाहतुकीमुळे नेहमीचे प्रवासी आणि फिरायला निघालेले पर्यटक तासन्तास एकाच जागी खोळंबून राहतात. हा नेहमीचाच विषय झाला आहे. त्यावर चर्चा होते. केव्हा तरी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी संबंधित अधिकार्यांवर आदेशाचे किंवा फर्मानाचे बाण सोडले जातात. यातून फारसे काही निष्पन्न होत नसते. प्रवाशांचा बहुमूल्य वेळ खाणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आता खरोखर प्रामाणिक प्रयत्नांची गरज निर्माण झाली आहे. हवेतून तीर मारून किंवा मंत्रालयातील आलिशान कार्यालयात बसून फुकाचे आदेश देऊन कोंडीतून जनतेची अर्थात प्रवाशांची सुटका होणार नाही. गेल्या काही दिवसात सलग सुट्ट्यांमुळे तसेच नाताळची सुट्टी लागल्याने महाराष्ट्रातील पर्यटन, धार्मिकस्थळी पर्यटकांची, भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. कोकणात हा अनुभव काकणभर सरसच येत आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तेथे दोन, चार पोलीस कामाचे नाहीत, तर योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

वाहने वाढली, आता वाहतूक कोंडी होणारच इथपत हा विषय संपवून टाकण्यात येऊ नये, तर गंभीरपणे घ्यायला पाहिजे. एखादा मंत्री किंवा उच्चपदस्थ रस्त्यावरून प्रवास करणार असेल तर तो रस्ता मोकळा करून देण्यासाठी पोलिसांची धडपड असते. या देशात फक्त मंत्र्यांच्याच वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बाकीच्यांची वेळ महत्त्वाची नाही. यामुळेच तथाकथित व्हीआयपी कल्चरवरून सर्वसामान्यांमध्ये प्रचंड चीड आहे. वाहतूक वाढली की कोंडी होणारच असे म्हणून पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी हतबल होण्यापेक्षा रस्त्यावरून जाणारा प्रत्येक जण हा व्हीआयपीच असल्याचे समजून त्याचा प्रवास सुखकर होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. तीन दिवसांपासून रायगड जिल्ह्यातील बहुतांश भागात वाहतूक कोंडीने कळस गाठला होता. हाच अनुभव रायगड जिल्ह्यालगतच्या पुण्यातील खंडाळा, लोणावळा परिसरात येत होता. शनिवार आणि रविवारी तर द्रुतगती मार्गावर ३५ ते ४० तास वाहतूक कोंडी झाली. प्रत्येक वाहनाला सक्तीने किमान तीन तास वाहतूक कोंडीत अडकून घ्यावे लागत होते. फिरायला निघालेल्यांचा अर्धा वेळ प्रवासात जाणार असेल तर पर्यटनाला चालना देण्याची टिमकी अलीकडे जोरजोरात वाजवली जाते ती नेमकी कशासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे. वाहतूक कोंडीतून पर्यटनाला चालना मिळेल असे जर कुणाला वाटत असेल तर साराच आनंद आहे. पर्यटन स्थळांकडे जाणार्या मार्गावर वारंवार असह्य ठरणारी वाहतूक कोंडी हमखास होणार असेल तर पर्यटनावर भविष्यात विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# कृषिक्रांतीची मुहूर्तमेढ!


भारताचे प्रथम कृषिमंत्री, कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे नवी दिल्ली येथे ११ डिसेंबर १९५९ ते फेब्रुवारी १९६० या दरम्यान आयोजन केले होते. अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांचे लोढेंच्या लोंढे हे प्रदर्शन पाहण्यास व ज्ञान ग्रहण करण्यास उपस्थित राहू लागले. एक नवा क्रांतीचा विचार घेऊनच शेतकरी परतत होते. जवळपास दोन कोटी शेतकऱ्यांनी ही कृषी ज्ञानगंगा प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवली. सर्वसामान्यच नव्हे तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर, इंग्लंडच्या महाराणी एलिझाबेथ, रशियाचे पंतप्रधान बुल्गानिन, कम्युनिष्ट पक्षाच्या सर्वेसर्वा निकिता कुश्चेव आदी देश-विदेशातील गणमान्य मंडळी व भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या ऐतिहासिक कृषी प्रदर्शनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. कृषी-क्रांतीचा उषःकाल निश्चित होणार असा विश्वास त्यावेळी संपूर्ण शेतकरी बांधवांमध्ये निर्माण झाला. पंजाबपासून तर कन्याकुमारीपर्यंत शेतकऱ्यांचे जबरदस्त संघटन उभे झाले. पंजाबचे शेतकरी तर 'हमारा पंजाबराव पंजाबदा' असे संबोधू लागले. त्याचवेळेस खऱ्या अर्थाने कृषिक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. एकंदरीत डॉ. पंजाबरावांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्याला जागतिक दर्जा मिळवून दिला. जगात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. माझा शेतकरी/शेतमजूर हा भारताचा राजा झाला पाहिजे हे भाऊसाहेबांचे स्वप्न होते



भारताचे प्रथम कृषिमंत्री, कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी ७ फेब्रुवारी १९५५ रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करून संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करून दिले. ट त्यानिमित्याने संघटनेच्या वाटचालीवर टाकलेला प्रकाश.त्यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील पापाळ येथील कुटुंबात २७ डिसेंबर १८९८ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शामराव आणि आईचे नाव राधाबाई. त्यांचे मूळ आडनाव कदम होते. प्राथमिक शिक्षण आपल्या गावी शिक्षण घेतल्यानंतर त्यांना सोनगाव आणि नंतर कारंजा लाड येथे पाठविण्यात आले. कारंजा लाड येथे, त्याने अमरावती येथील हिंद हायस्कूल आणि पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी नववी इयत्तेत प्रवेश केला त्यावेळी उच्च शिक्षण भारतात उपलब्ध नव्हते. बरेच विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्याला केंब्रिज विद्यापीठातून बॅरिस्टर व्हायचे होते. घरी तीव्र दारिद्र्य असूनही, त्याने प्रवास करण्यासाठी पुरेसे पैसे मिळविले. त्यानंतर ते केंब्रिज विद्यापीठात गेले आणि १९२१ मध्ये पीएचडी, बॅरिस्टर पदवी आणि संस्कृतमध्ये एम.ए. त्यांनी पीएच.डी. मूळ आणि वैदिक साहित्यातील धर्माचा विकास या विषयासह डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक उपक्रम महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजात त्यांनी शिक्षण घेतले. अमरावतीच्या अंबाबाई मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी सत्याग्रह केला, ज. भीमराव रामजी आंबेडकर यांनी या आंदोलनात त्यांचे समर्थन केले. मंदिर व्यवस्थापनाने नंतर अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला.डॉ. देशमुख यांच्या कार्यकाळात चिकू, आंबा, नारळ, संत्री यांच्या नव्या जाती निर्माण करून फळबागांची वाढ करण्यात आली. त्यांना १९४६ मध्ये कलकत्त्याला भरलेल्या जागतिक अन्न व कृषी संघटनेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित करण्यात आले. दिल्लीच्या कृषी संशोधन केंद्रात लागलेले कृषीविषयक शोध त्यांनी संपूर्ण भारतातील खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचवले.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्यांच्या घरापासून दुसरी समानता चळवळ सुरू केली.त्याचा विवाह सोहळा साधा सोपा आणि मुंबईत पार पडला. विवाहसोहळा संपल्यानंतर जेव्हा ते अमरावती येथे पोहोचले आपल्या सर्व

**डॉ. धनराज चक्रे**
अमरावती



धर्मीय मित्र मंडळी सोबत त्यांनी भोजन केले .डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी आपल्या समाजातून अस्पृश्यता दूर करण्यासाठी असे अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. त्यांनी १९३१ मध्ये कर्ज एकत्रीकरण कायद्यावर स्वाक्षरी करून कायद्यात रुपांतर केले. यापुढे शेतकर्यांना त्यांचे गहाण भरणे बंधनकारक नव्हते. भाऊसाहेब १९५२ ते १९६२ या काळात भारताचे कृषी मंत्री होते. त्यांनी या काळात कृषी आणि शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी कार्य केले. पंजाबी शेतकरी भाऊसाहेबांचा उल्लेख 'पंजाबराव पंजाब' असा करू लागले. लोकसभेसाठी तीन वेळा निवडून गेले. डॉ. देशमुख यांची नेहरूंनी भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून निवड केली. भारतीय राज्यघटना तयार करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी बी. आर. आंबेडकर यांच्या प्रेरणेने आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे समर्थक म्हणून काम पाहिले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र कामगार पक्षाच्या विदर्भ प्रांत सचिव होते. त्यांची कृषी विद्यापीठाची संकल्पना अमेरिकेचे अध्यक्ष ड्वाइट यांच्यासह जगभरातील मान्यवरांनी कृषी जत्रेला भेट दिली. आयसनहॉवर, यूएसएसआर अध्यक्ष निकिता ख्रुश्चेव्ह, लॉर्ड आणि लेडी माउंटबॅटन. त्यांनी देशभरात कृषी विद्यापीठे स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू केली आणि कृषी शिक्षण आणि संशोधनास पाठिंबा दर्शविला भाऊसाहेबांनी १९३१ मध्ये अमरावती येथे शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिवाजी शिक्षण संस्थेकडे आता १५४ हून अधिक संस्था आहेत आणि ही महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे. महाविद्यालये, उच्च माध्यमिक शाळा, बाल मंदिरे, प्राथमिक शाळा, प्रशिक्षण केंद्रे, व्यायाम शाळा, वसतिगृहे, वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी शाळा आणि कृषी शाळा या संस्थांचा समावेश आहे. भाऊसाहेबांनी गावागावात शिक्षणाची विदर्भात ज्ञानगंगा नेली. त्यामुळे ग्रामीण तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली म्हणून अशा या थोर पुरुषाला प्रथम कृषी मंत्री कृषी रत्न शिक्षण महर्षी भाऊसाहेब यांना अभिवंदन !

# पणन महासंघाला अखेर कापूस खरेदीची परवानगी

## ७०२० रुपये क्विंटल हमीदराने होईल खरेदी

## राज्यभरातील शेतकऱ्यांना दिलासा

**दि२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : खुल्या बाजारात कापसाचे दर साडेपाच हजार रुपये क्विंटलपर्यंत खाली घसरले आहेत. अशा परिस्थितीत किमान हमीभावाने कापूस विक्रीसाठी राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा रेटा पणनकडे वाढला होता. पणन महासंघाच्या माजी अध्यक्षांनी केंद्र आणि राज्याकडे पाठपुरावा केला. अखेर पणन महासंघाला कापूस खरेदीची परवानगी देण्यात झाली आहे. याविषयीचे पत्र सीसीआयने पणन महासंघाला पाठविले आहे.

### अटी शर्थीच्या आधारे करावी लागणार खरेदी

कापूस पणन महासंघाला कापसाची खरेदी करताना सात अटींचे पालन करावे लागणार आहे. कापूस खरेदी करताना सीसीआय पणन महासंघाला कुठलीही क्रेडिट लाइन देणार नाही. कापूस खरेदीसाठी कुठलाही पैसा देणार नाही. विशिष्ट जातीचा कापूस खरेदी करताना त्या जातीचाच कापूस आणि तोच दर त्याला द्यावा लागणार आहे. खर्चाच्या प्रत्येक बाबीवर निर्धारणापेक्षा जास्त खर्च मान्यहोणार नाही. गोडाऊन, जिनिंग, प्रेसिंग, हे युनिट सीसीआयच्या नियमानुसारच घ्यावे लागणार आहेत. खरेदी करताना सीसीआय आणि पणनचा तपशीलवार करार असणार आहे. कापूस खरेदीचे ऑडिटही पणनला सादर करावे लागणार आहे. याप्रमुख बाबींच्या अधिन राहून कापूस खरेदी होणार आहे. या विषयाचे पत्र केंद्रीय अव्वर सचिव इंदिरा प्रियदर्शन छल्ला यांनी काढले आहेत.



केंद्र आणि राज्य शासनाकडे कापूस खरेदी केंद्र उघडण्यासाठी वारंवार पाठपुरावा केला आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे त्याबाबत कापूस उत्पादकांचा प्रश्न मांडला.वस्त्रोद्योग विभागाने कापूस खरेदी करण्याला परवानगी दिली आहे. यामुळे लवकरच याबाबत सर्वानुमते निर्णय घेतला जाईल.

**राजाभाऊ देशमुख,**
**माजी अध्यक्ष, कापूस पणन महासंघ**

यावर्षी केंद्र शासनाने कापसाला ७०२० रुपये क्विंटलचा हमीदर जाहीर केला. मात्र हमीदरातील कापूस खरेदी करण्यासाठी कापूस पणन महासंघाचे का केंद्रच उघडले गेले नाही. यामुळे खासगी व्यापारी वाट्टेल त्या दरात कापसाची खरेदी करीत आहेत. यातूनकापूस खरेदीचा दर ५५०० रुपये क्विंटलपर्यंत खाली घसरला आहे. - राज्यात सीसीआयचे बोटावर मोजता येतील, इतके कमी केंद्र आहेत. अशा

स्थितीत कापूस पणन महासंघाने हमी दरात कापूस खरेदी करावी, अशी मागणी वाढली होती.कापूस खरेदीसाठी कापूस पणन - महासंघाने वस्त्रोद्योग विभागाशी पत्रव्यवहार केला. २६ डिसेंटरलावस्त्रोद्योग विभागाने सीसीआयचे सब एजंट म्हणून कापूस खरेदीला परवानगी देत आहे. असे पत्र काढले आहे. यामुळे कापूस खरेदीचा पणन महासंघाचा मोठा अडसर दूर झाला आहे.




# कचरा समजून लसणाची साल फेकून देताय? 'ही' चूक करू नका कारण

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक** - लसूण हे औषधी गुणधर्मांनी समृद्ध एक औषधी वनस्पती आणि मसाला आहे, ज्याचे सेवन केल्याने अनेक आरोग्यास अनेक फायदे मिळतात. लसणाचा वापर औषधांपासून ते स्वयंपाकापर्यंत प्रत्येक गोष्टीत केला जातो. लसणात प्रथिने, फॅट्स, खनिजे आणि लोह असे पोषक तत्व असताता जे आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. याशिवाय लसणात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी आणि सल्फ्यूरिक ॲसिड विशेष प्रमाणात आढळते. लसूण हा एक असा मसाला आहे ज्याचे सेवन त्वचेसाठी आणि आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

लसणाचे सेवन केल्याने रक्त स्वच्छ राहते आणि त्वचेशी संबंधित समस्या दूर होतात. त्वचेवरील पिंपल्स दूर करण्यासाठी लसणाचे सेवन खूप प्रभावी ठरते. अँटिऑक्सिडेंट गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या लसणाचे सेवन केल्याने खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित होते आणि हृदयविकारांपासून बचाव होतो.

उच्च रक्तदाब असलेल्या लोकांनी लसणाचे सेवन केल्यास त्यांचे बीपी सहज नियंत्रित ठेवता येते. औषधी गुणांनी समृद्ध असलेल्या लसणाची साले काढून त्याचा वापर केला जातो, पण तुम्हाला माहिती आहे का, की लसणाप्रमाणेच त्याची सालेही आरोग्यासाठी गुणकारी ठरतात.

लसूण साल आहारात कशी वापरावी

अनेकदा आपण लसूण वापरतो आणि त्याची साले फेकून देतो. तज्ज्ञांच्या मते, लसणाची साले टाकाऊ नसून ती उपयुक्त आहेत. लसणाची साले फेकून देऊ नका तर वापरा. तज्ञांनी सांगितले की, आपण लसणाच्या सालीपासून खत बनवू शकता आणि ते अन्नात देखील घेऊ शकता. लसणाच्या सालीची पावडर घरीच बनवून त्याचा जेवणात वापर करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

क्लिनिकल डायटीशियन गरिमा गोयल यांनी द इंडियन एक्सप्रेसला माहिती देताना सांगितले की, लसणाच्या सालीची पावडर बनवण्यासाठी लसणाची साले एकत्र करून वाळवून घ्या. ही साले बारीक करून त्याची पावडर बनवा. यामुळे अन्नाची नासाडी कमी होईल आणि लसणाची पेस्ट घरी मोफत तयार करू शकता. घरगुती लसूण पावडर ताजे असेल आणि जेवणाची चव आणि



गुणवत्ता दोन्ही सुधारेल.

घरी लसूण पावडर कशी बनवायची

घरच्या घरी लसणाची पावडर बनवून तुम्ही लसणाच्या सालींचा उत्तम वापर करू शकता. तज्ज्ञांच्या मते, लसणाच्या सालीचे सेवन करण्यासोबतच त्याचा औषध म्हणूनही वापर केला जाऊ शकतो. लसणाच्या सालींमध्ये अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. जर तुम्हाला तुमच्या पायावर सूज आल्याने त्रास होत असेल तर लसणाची साल पाण्यात उकळून घ्या आणि त्या पाण्याने पाय धुवा.

लसूण पावडर बनवण्यासाठी प्रथम लसूण साले गोळा करा. ताज्या लसणाच्या पाकळ्यांची साले वाळवा. सुकवण्यासाठी साल ट्रे किंवा स्वच्छ जागी पसरवा आणि त्यांना अनेक दिवस हवेत सुकू द्या. लसणाची साले लवकर वाळवायची असतील तर ओव्हनचाही वापर करू शकता. ही साले बारीक करून पावडर होईल. जर तुम्ही ते तुमच्या जेवणात सेवन केले तर तुमचे जेवण रुचकर होईल.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचा उद्याला दर्यापुरात चक्काजाम

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताकदर्यापूर** १५स्वातंत्र्य विदर्भ राज्याच्या मागणीसाठी दर्यापूर शहरात उद्या दिनांक २९ डिसेंबर ला सकाळी ११ वाजता शिवाजी चोक बस डेपो महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात विदर्भ राज्य आंदोलन समितीचे नेते माजी आमदार ॲड वामनराव चटप, प्रकाश पोहरे यांच्या मारगदर्शनाखाली रस्ता रोको आंदोलनात करण्यात येणार असून महाराष्ट्रात समाविष्ट झाल्यापासून विदर्भाचा विकास झाला नाही. विकास तर सोडाच विदर्भाचे प्रश्न मार्गी लागू शकत नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे वेगळे विदर्भ राज्य हाच एकमेव पर्याय असल्याचे समितीचे म्हणणे आहे. विविध आंदोलन करण्यात आल्यानंतर वेगळ्या विदर्भाचा निर्णय होत नसल्याने दिनाक २९ डिसेंबर ला करण्यात येणार असून विदर्भवादी असे शरीरातील जनतेने मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन विदर्भ राज्य आंदोलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील साबळे,युवा जिल्हाध्यक्ष अमोल कंटाळे, निखिल भायने, विष्णू भाऊ काळमेघ, अशोकराव राणे, बाळासाहेब वडतकर, गणेशराव अरबट,दत्ता पाटील कुंभारकर, रवींद्रसिह ठाकूर,सुरेश भाऊ जोगी,गजानन पाटील दुधाट, संजय हाडोळे, देविदास पाटील ढोक, मनोहरदादा रेचे, अशोक पाटील गिते, संजय हिंगे, अरुणभाऊ गोंडचवर, ओमप्रकाश मुरतकर,गजानन गाढेकर, मधुकर मोरे, महेश देहणकर, प्रभाकर पाटील गहले, दिनेश पाटील ब्राह्मणकर, दिलीप पाटील वडतकर, ओमप्रकाश कंकाळे, संतोष भाऊ गायकी, सुरेश पाटील गावंडे,मधुकर मोरे, न्यानेश्वर वानखडे, अनिल पाटील चोरे, किशोर पाटील काळमेघ,राजूभाऊ उपाध्ये, परीक्षित राणे, शैलेश राणे, विलास राणे यांनी केले आहे.

# व्यवस्थापक, चालकच निघाले चोर

## मोपेडस्वारांनी २३ लाख रुपये चोरून नेल्याचा केला होता बनाव

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : दुचाकीने आलेल्या अज्ञात तिघांनी मारहाण करून कारमधील २३ लाख रुपयांची रोकड लांबविल्याची तक्रार येवदा पोलिसांत नोंदविली गेली होती. स्थानिक गुन्हे शाखेने त्या घटनेचा अवघ्या १२ तासांत उलगडा करत तिन्ही आरोपींना अटक केली. आरोपींकडून रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली. चालक आणि व्यवस्थापकानेच लुटीचा तो कट रचल्याचे उघड झाले. सौरभ मनोज साहू (२३, रा. मसानगंज, अमरावती), श्रीजीत मुरलीलाल साहू (३१, रा. पटवाचौक, अमरावती) व प्रमोद नामदेवराव ढोके (४२, रा. विलासनगर, अमरावती) अशी अटक आरोपींची नावे आहेत. २६ डिसेंबर रोजी दुपारी दर्यापूर ते अकोला रोडवरील लासूर पॉवर हाऊसजवळ सौरभ साहू व प्रमोद ढोके यांनामारहाण करून अज्ञात तिघांनी २३ लाख ५ हजार ४८० रुपये व त्यांचे मोबाइल हिसकावून पळ काढला, अशी तक्रार अमरावती येथील दर्शितअग्रवाल यांनी येवदा पोलिसांत नोंदविली होती. त्या

### दोन्ही आरोपींच्या बयानात तफावत

एलसीबीने फिर्यादी दर्शित अग्रवाल यांच्याकडून गुन्ह्याची पार्श्वभूमी समजून घेतली. तथा गुन्ह्यातील पीडित सौरभ साहू व चालक प्रमोद ढोके यांना विचारपूस केली. दोघांचेही कथनामध्ये तफावत दिसून आल्याने एलसीबीने सौरभ साहू याला पुन्हा विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.



गुन्ह्याचा तपास करताना एलसीबीने पीडितांचीच उलट तपासणी केली. त्यादरम्यान आरोपींनी बनाव केल्याची कबुली दिली. सौरभ व प्रमोद कारने, तर श्रीजित हा मोपेडने गेला होता. ती रक्कम घेऊन तो अमरावतीत पोहोचला होता.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, पुरस्काराने शरद पवार सन्मानित

## नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान







## भाऊसाहेबांच्या नावे पहिला पुरस्कार देत श्री शिवाजी शिक्षण संस्थेने केला कार्याचा गौरव





**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती – :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा डॉ. भाऊसाहेबांच्या नावे दिला जाणारा पहिला 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' देशाचे माजी कृषिमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते बुधवारी प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपयांचा धनादेश व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

अमरावती येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. यावेळी खा. नवनीत राणा, आ. सुलभा खोडके, माजी गृहमंत्री तथा आ. अनिल देशमुख, आ. किरण सरनाईक, माजी खासदार अर अशोकराव मोहोळ, प्रियदर्शन देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, उपाध्यक्ष गजानन पुंडकर, जयवंतराव पाटील यांसह सदस्य हेमंत देशमुख व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

भाऊसाहेबांच्याभाऊसाहेबांच्या प्रयत्नातून फार मोठे कार्य विदर्भात उभे झालेले आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यामध्ये त्यांनी मोठा वाटा उचलल्याचे गडकरी म्हणाले.भाऊसाहेबांनी त्या काळामध्ये जो विचार मांडला तो शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीचा व विकासाचा आणि याकरिता त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित केले. भाऊसाहेबांच्या नावाने दिला जाणारा पहिला पुरस्कार शरद पवार यांना प्रदान करण्यात आल्याने या पुरस्काराची उंची वाढल्याचे ना. गडकरी म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केले. कार्यक्रमात संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे लोकार्पण, पुस्तके, दैनंदिनी, दिनदर्शिका याचे विमोचन करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी वेल्फेअर फंड व सोसायटीच्या निधीतून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे धनादेश गरजू विद्यार्थिनींना देण्यात आले. सं संचालन डॉ. किशोर फुले, आभार प्रदर्शन कि दिलीप इंगोले यांनी केले. कार्यक्रमालासंस्थेचे आजीवन सदस्य, संस्थेचे कर्मचारी विद्यार्थी व शिव परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुरस्कार निधीत भर टाकून महिला शेतकऱ्यांचा सन्मान

मातोश्री शारदाबाई यांनी शेती करून आम्हा सर्व भावंडांना शिक्षित केले आहे. त्या माऊलीचा आदर्श समाजासमोर राहावा, यासाठी पुरस्काराच्या राशीमध्ये अधिक १५ लाख देणार व यामधून येणाऱ्या व्याजातून महिला शेतकऱ्याचा सन्मान करण्याचे आवाहन खा. शरद पवार यांनी केले.

### भाऊसाहेबांच्या नावाने १२५ रुपयांच्या नाण्याचे विमोचन

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५व्या जयंतीप्रित्यर्थ भारत सरकारच्या वतीने १२५ रुपयांचे नाणे काढण्यात आले आहे. या कार्यक्रमात उपस्थित शिवप्रेमीच्या टाळ्यांच्या कडकडाटात ना. नितीन गडकरी व खासदार शरद पवार यांच्या हस्ते या नाण्यांचे विमोचन करण्यात आले.

# महिला महाविद्यालयात होणार संक्रांत उत्सव २०२४ साजरा

## महिला उद्योजक राहणार उत्सवाचे विशेष आकर्षण



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय, अमरावती तर्फे आयोजित जिल्हास्तरीय महिला उद्योजक मेळावा संक्रांत उत्सव २०२४ साजरा करण्यात आल्याची माहिती महिला महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ.अविनाश मोहरील यांनी पत्रपरिषदेदरम्यान बोलतांना दिली.

महिला महाविद्यालय अमरावती तर्फे जिल्हास्तरीय भव्य उद्योजक मेळावा दिनांक १० व ११ जानेवारी २०२४ ला सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत आयोजित करण्यात येत आहे. महिला उद्द्योजकांना सामाजिक व आर्थिक हातभार लावणे, त्यांच्या उद्योगाला शहरामध्ये प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, उत्पादित वस्तूंच्या विक्री करिता व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने गृह अर्थशास्त्र विभागातर्फे जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.संक्रांत हा आपल्या महाराष्ट्राचा महत्त्वाचा सण मानला जातो याचेच औचित्य साधून गृहिणींकरिता संक्रांतीसाठी आवश्यक असणाऱ्या घरगुती वस्तू, हस्तकला वस्तू तसेच विविध नाविन्यपूर्ण स्टॉल या उद्योजक मेळाव्याचे खास आकर्षण असणार आहे. स्टॉल बुकिंग ची अंतिम तारीख ०५ जानेवारी २०२४ आहे. पत्रपरिषदेला प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील,डॉ.भावना वासनिक,डॉ.अंकुश गिरी,प्रा.सचिन देशमुख उपस्थित होते.

महिला उद्योजक मेळाव्याचे रजिस्ट्रेशन सुरू आहे. ज्यांना स्टॉल बुक करायचे असतील त्यांनी खालील नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन देखील या वेळी करण्यात आले आहे.

७५०७३७४५७५, ९४२२३८५२५३ , ७०२००९६५९७

**स्टार ग्रुप कॅरीओकी गाण्याचे रजिस्ट्रेशन करिता–** ७९७२८५८००९, ९५५२५१७८५९, ९१५८४५८९४२

### महिला उद्योजक मेळाव्याचे विशेष आकर्षण

१) 'संक्रांत सुंदरी स्पर्धा (या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या गृहिणीनी काळे वस्त्र परिधान करून व संक्रांत विशेष वेशभूषा करून येणे आवश्यक आहे)

२) संक्रांत विशेष सेल्फी पॉईंट' (सेल्फी पॉईंट महिला महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये उपलब्ध राहील)

३) अनेक आकर्षक कुपन

४) सर्वोत्कृष्ट स्टॉल सजावट स्पर्धा

५) कॅरीओकी (गाण्यांची मैफिल)

# उत्तमसरा येथे बिटस्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन

## गणोरी,भातकुली व आसरा केंद्रातील २००विद्यार्थी खेळाडू सहभागी होणार



**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक भातकुली** पंचायत समिती भातकुली अंतर्गत भातकुली परिक्षेत्रातील जि.प.प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाचे २९ व ३० डिसेंबरला जि.प.प्राथमिक शाळा उत्तमसरा येथे आयोजित करण्यात आले आहे.यात गणोरी,भातकुली व आसरा केंद्रातील २०० विद्यार्थी बाल खेळाडू सहभागी होणार आहे. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार २९ डिसेंबरला सकाळी ११ वाजता उत्तमसरा ग्रामपंचायत सरपंच धर्मेंद्र मेहरे यांच्या हस्ते होणार असुन कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास रंगारी हे राहणार असुन विशेष प्रमुख अतिथी भातकुली पं.स.चे गटविकास अधिकारी डॉ.प्रफुल्ल भोरखडे, गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे,सहा.गटविकास अधिकारी प्रल्हाद तेलंग उपसरपंच संगीता मानकर,उपाध्यक्ष सौ.सविता जुनघरे ,प्रमुख अतिथी शिक्षण विस्तार अधिकारी संतोष घुगे,शा.पो.आहार अधिक्षक नरेंद्र गायकवाड,अध्यक्ष शा.व्य.समितीचे प्रविण शेवतकर आणि जि.प.माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर उपस्थित राहणार आहे.या क्रीडा महोत्सवात सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात येणार आहे

# मध्यवर्ती कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी

## कैद्यासह अधिकारी, कर्मचारी जखमी



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** अमरावती मध्यवर्ती कारागृहात अमरावती व पुणे येथील कैद्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. मध्यस्थी करण्यास गेलेले कारागृहातील एक अधिकारी व दोन कर्मचारी व अमरावती येथील कैदी या घटनेत जखमी झाल्याची माहीती आहे.

अमरावती मध्यवर्ती कारागृहातील अमरावती येथील कैदी बंदीस्त आहे. सदर कैद्यांसोबत पुणे येथील काही कैद्यांचे गत २२ तारखेला भांडण झाले होते. यानंतर अमरावती येथील कैद्याचे नातेवाईक त्यास भेटण्यासाठी आले होते. भेटीनंतर हा कैदी त्याच्या बॅरेकमध्ये परत जात होता. यावेळी पुणे येथील काही कैद्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. जेवण करण्याची थाळी वाकवून त्याच्यावर प्रहार करण्यात आल्याने तो जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित अधिकारी व दोन कर्मचार्यांनी अमरावतीच्या बंदीजनास सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, कैद्यांनी त्यांच्यावर देखील हल्ला चढविला.या घटनेची माहीती मिळताच पोलिस उपायुक्त सागर पाटील यांच्यासह क्यूआरटी पथक व पोलिसांचा ताफा कारागृहात पोहोचला. दरम्यान याप्रकरणी हल्लेखोर पुणे येथील कैद्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरु आहे. फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार देण्यात आली असून गुन्हा आहे.

# लोकगीतांमधून अयोध्येच्या रामाचा गजर

## मेळघाटात शेकडोटीवर रंगते मैफील



**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – मेळघाटातील आदिवासींच्या परंपरा, गीत–गायन आणि सणासुदीविजयी अनेक प्रकारच्या कपोलकल्पीत बाबी ऐकायला मिळतात. फगनाय म्हणून लोकगीतात चक्क श्रीरामाची महिमा आणि हनुमान–लक्ष्मण–जानकी विषयीचे भजन ऐकून संस्कृतीची महानता आणि सनातनी भाव लक्षात येतो.

सध्या मेळघाटात कडाक्याची थंडी सुरू आहे. अशात गावात शेकोटी पेटवून फगनाय लोकगीतात मश्गुल आदिवासींचा फोटो टिपलाय कुंतल पाटील नावाच्या कबड्डी पटूने. सर्वत्र थंडी सुरू आहे. फगनाय गीतामध्ये हनुमान, श्रीराम, परशुराम, भरतचा उल्लेख येत असल्याने आदिवासी परंपरांमध्ये सनातन संस्कृती किती खोलवर रूजली आहे, हे लक्षात येते. 'किनकिनले हाथों में ढोल, और टिमकी, किनके हाथों में डोलारा', 'राम के हाथों में ढोल तो, लक्ष्मण के हाथों में डोलारा', उपरोक्त भजन शोभाराम जावरकर, सज्जू, सिताराम, किशोर, हिरा, मांगीलाल गात आहेत तर आप्पा पाटील ढोलकी वाजवून त्यांना साथ देत आहेत.

# तरुणांनी श्रीरामांचा आदर्श घ्यावा–काजल हिंदुस्थानी

## नांदगाव पेठ येथे पार पडली विशाल धर्मसभा

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** हिंदूविरोधी मानसिकता असणाऱ्या व चित्रपटातील खानावळ समजल्या जाणाऱ्या नायकांचा आदर्श आजकालच्या तरुणांमध्ये दिसून येत असल्यामुळे हिंदूच हिंदू विरोधात उभा ठाकतोय त्यामुळे या तरुणांनी श्रीरामाचा आदर्श घेऊन हिंदू संस्कृतीचे जतन करावे असे आवाहन प्रमुख वक्ता काजल हिंदुस्थानी यांनी नांदगाव पेठ मधील विशाल धर्मसभेत केले.सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक स्थित ग्रामपंचायत पटांगणात विहिप व बजरंग दल च्या वतीने या धर्मसभेचे आयोजन केले होते. गीताजयंती व शौर्य दिवसाच्या अनुशंगाने नांदगाव पेठ येथील ग्रामपंचायत पटांगणात या धर्मसभेचे आयोजन करण्यात आले होते.या धर्मसभेच्या व्यासपिठावर काजल हिंदुस्थानी या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या तर गोरक्षक नेहा पटेल व भक्ती देशमुख या सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित होत्या.सोबतच शालीकराम महाराज खेडकर, अजितपाल मोंगा, सिद्धू सोळंकी, चेतन वाटणकर,प्रेमानंद शर्मा, विलास हळवे यांच्यासह विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे पदाधिकारी उपस्थित होते.प्रारंभी अयोध्या येथून आलेल्या कलशयात्रेचे धर्मसभेला सुरुवात झाली.संतोष गहरवार यांनी प्रस्तविकेमधून धर्मसभेबाबत माहिती दिली. यानंतर गोरक्षक नेहा पटेल यांनी गोसेवा आणि गोरक्षण बाबत उपस्थितांना माहिती देऊन घरातील गायी पैश्यासाठी कसायांना न विकण्याचे आवाहन केले. त्यानंतर नांदगाव पेठ येथील सुपुत्री भक्ती अरविंद देशमुख यांनी अयोध्या येथील राममंदिर ही तमाम हिंदूंसाठी गौरवाची बाब असून यासाठी ज्यांनी प्राणांची आहुती दिली त्या कारसेवकांबद्दल आज आदर निर्माण होत असल्याचे म्हटले. आमची आठवी पिढी नांदगाव पेठ येथील राममंदिराची सेवा करत असल्याचे देखील त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. या धर्मसभेला



शेकडो हिंदू बांधव व भगिनींनी उपस्थिती होती. जय श्रीराम, वंदे मातरम, भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या धर्मसभेच्या यशस्वीतेसाठी बजरंग दल,विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

### कलशयात्रा ठरली आकर्षण



अयोध्या येथील आलेल्या अक्षद कलशची धर्मसभेपुर्वी कलशयात्रा गावामधून काढण्यात आली.श्रीराम यांची भव्य प्रतिमा सुद्धा या यात्रेमध्ये होती. टाळ मृदुंगाच्या गजरात व जय श्रीरामच्या घोषणांनी निघालेली ही कलशयात्रा प्रमुख आकर्षण ठरली होती.

# शरद पवार पोहचले बच्चू कडू यांच्या घरी

## कांदा,संत्रा सह शेतींच्या विविध विषयावर झाल्यात गप्पा





### शाल श्रीफळ संत तुकारामांची मूर्ती देत यथोचित सत्कार

शरदचंद्रजी पवार हे आज आमदार बच्चू कडू यांच्या कुरळपूर्णा येथील घरी पोहचताच तिचे स्वागत करण्यात आले त्यानंतर बचत कडू यांनी पवारांच्या अंगावर शाल पांघरली तर नयना कडू यांनी संत तकारामांची मूर्ती व पुष्पगुच्य देत स्वागत केले. यावेळी कडू परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक , कुरळपुर्णा** – दिव्यांग कल्याण मंत्रालय विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या कुरळ पूर्णा येथील घरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे आज सकाळी पोहचले बुधवारी पवार यांनी आपण गुरुवारी बच्चू कडू यांच्या कडे चहा घ्यायला जाणार आहोत, असेसांगितले होते.त्यानुसार आज शरद पवार बचककड्य यांच्या घरी पोहचले.

१० वर्षांपूर्वी विदर्भ मिल बंद पडली आणि फिनले मिलचा विस्तार इतर ठिकाणी होणार होता. तेव्हा शरद पवार कृषीमंत्री होते. मी आणि आर. आर. आबा त्यांना भेटायला गेलो. तेव्हा शंकरसिंह वस्त्रोद्योग मंत्री होते. त्यांच्याशी शरद पवारांनी चर्चा केल्यामुळे ती मिल आपल्याला अचलपुरात सुरू करता आली. त्याची जाणीव म्हणून आम्ही शरद पवारांना आमंत्रण दिलं. असं बच्चू कडू म्हणाले.मदतीची जाणीव म्हणून आम्ही त्यांना फोन केला. आता इथून चाललेच आहेत तर घरी या असं आम्ही त्यांना सांगितलं. ते आमंत्रण त्यांनी स्वीकारलं, असंही बच्चू कडूंनी नमूद केलं.



गेल्या काही दिवसांपासून बच्चू कडूंनी राज्यातील महायुती सरकारवर वेगवेगळ्या मुद्द्यांवरून नाराजी किंवा प्रसंगी टीका केल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे ते सरकारमधून बाहेर पडणार का? असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे. त्यावर बच्चू कडूंनी यावेळी भूमिका स्पष्ट केली. त्यासाठी सरकारवर टीका–टिप्पणी, नाराजी वगैरे सगळं करण्याची गरज नाही. आम्ही सध्या एकनाथ शिंदेंसोबत आहोत. जोपर्यंत ते मुख्यमंत्री आहेत, तोपर्यंत महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला जाणार नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी नसतील तर मग कदाचित आम्ही तसा निर्णय घेऊ, असं थेट आमदार विधान बच्चू कडू यांनी केलं आहे.

आमचा पक्ष आहे. पक्षाचं भलं कुठे होतंय, त्यानुसार विचार केला जाईल. जिथे राजकीय अस्तित्व मजबूत होईल, तो आमचा राजकीय सोबती असेल, असं सांगतानाच बच्चू कडूंनी जर सरकारमधून बाहेर पडायची वेळ आलीच, तर कोणत्या जागांसाठी आग्रह धरणार, याविषयीही भाष्य केलं. आम्ही एक–दोन जागेसाठी काही करणार नाही. केलं तर तीन–चार जागा घेऊनच महाविका आघाडीकडे जाण्याचा विचार करू. नाहीतर तसं काही करण्यात अर्थ नाही. आणि निवड अमरावतीच का? अनेक मतदारसंघ आहेत. वर्धाही आहे. यवतमाळही आहे. जळगावही आहे, असं ते म्हणाले.तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असेपर्यंत महाविकास आघाडीत जाण्याचा काही विचार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.यावेळी दोघांमध्ये शेतकऱ्यांसंबंधी चर्चा झाली. प्रहारचे लोकसभेचे संभाव्य उमेदवार रवींद्र वैद्यही चर्चेत सहभागी झाले होते.

# भाऊसाहेबांनी रचला कृषी प्रदर्शनाचा पाया

## डॉ. सी. डी. मायी यांचे प्रतिपादन

### शाल श्रीफळ संत तुकारामांची मूर्ती देत यथोचित सत्कार

शरदचंद्रजी पवार हे आज आमदार बच्चू कडू यांच्या कुरळपूर्णा येथील घरी पोहचताच तिचे स्वागत करण्यात आले त्यानंतर बचत कडू यांनी पवारांच्या अंगावर शाल पांघरली तर नयना कडू यांनी संत तकारामांची मूर्ती व पुष्पगुच्य देत स्वागत केले. यावेळी कडू परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीचे उदघाटन



**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** यांच्या १२५ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था, कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्या संयुक्त वतीने श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या ७० एकर प्रक्षेत्रावर २७ ते ३० डिसेंबर पर्यंत चार दिवसीय राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी आयोजित करण्यात आले असून आज सकाळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत उदघाटन झाले. त्यावेळी डॉ. मायी बोलत होते. माजी मंत्री आ. यशोमती ठाकूर यांनी या प्रदर्शनीचे उदघाटन केले. यावेळी विजय अण्णा बोराडे, माजी खासदार अशोक मोहोड, आ. किरण सरनाईक, कृषी उपसंचालक किशोर मुळे, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, ॲड. जयवंत पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष व कृषी प्रदर्शनी आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीप इंगोले, कार्यकारी परिषदेचे सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेश खोटरे, प्रा. सुभाष बनसोड, सचिव डॉ. वि. गो. ठाकरे, स्वीकृत सदस्य डॉ. महेंद्र ढोरे, नरेशचंद्र पाटील, डॉ. पी. एस.वायाळ, डॉ.अमोल महल्ले प्रामुख्याने उपस्थित होते.

भाऊसाहेबांनी अत्यंत पुरोगामी पद्धतीने अनेक क्षेत्रात कार्य केले असून ते खर्या अर्थाने भारतरत्न होते. त्यांना भारतरत्न मिळाले पाहिजे म्हणून आपण प्रयत्न केले पाहिजे , असे आवाहन आ. यशोमती यांनी आपल्या भाषणातून केले.आयोजनामागची भूमिका मांडताना दिलीप इंगोले म्हणाले, शेतकर्यांच्या विकासासाठी आम्ही जे करतो त्याचा फायदा शेतकर्यांना मिळाला तर तीच भाऊसाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल. संचालन डॉ. राजेश मिरगे तर सचिव डॉ. वि. गो. ठाकरे, प्राचार्य डॉ.नंदकिशोर चिखले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर प्रा. के. आर.पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला संस्थेचे आजीव सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नऊ शेतकर्यांचा सन्मान**

कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणार्या विदर्भातील प्रगतीशील शेतकरी गंगा जावरकर – मेळघाट, वर्षा लांजेवार – चंद्रपूर, गोपाल येऊल – अकोला, दिलीप पोहणे – वर्धा, मोहन जगताप – बुलढाणा, पूजा ढोक – वाशीम, सुनील घावडे – यवतमाळ, मनोज जवंजाळ – नागपूर, ज्ञानेश्वर बुरडे – भंडारा या नऊ शेतकर्यांचा या समारंभात शाल, स्मृतीचिन्ह व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# नांदुरा बु. येथील पेढी नदीच्या पुलावर ट्रक ऑटोचा भीषण अपघात

## तिघांचा घटनास्थळी मृत्यू; चार जण गंभीर जखमी

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –अमरावती चांदुर बाजार मार्गावरील नांदुरा बु येथील पेढी नदीवरील पुलावर आज सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास सिमेंट मिक्सर ट्रक व ऑटो रिक्षा मध्ये भीषण अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, ऑटो रिक्षामध्ये प्रवास करणारे वाकोडे कुटुंबियांतील तीन प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर अन्य चार गंभीर जखमी झाले. जखमीरुग्णांणा तातडीने जिल्हा सामान्य रुणालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार चिंचोली काळे येथील वाकोडे कुटुंबीय आपल्या घरच्या ऑटो क्रमांक चक२७ झ ३४१० ने पोटे कॉलेज समोरील लुंगे लॉन येथे

लग्न समारंभाला जाण्याकरीता चिंचोली येथून



निघाले. अमरावती शहराच्या दिशेने येणाऱ्या वाकोडे कुटुंबियांच्या या ऑटो ला नांदुरा बु. येथील पेढी नदीच्या पुलाच्या कॉर्नर वर सिमेंट मिश्चर ट्रक क्रं. चक ०४ गत २१०७ ने भीषण धकड दिली. ही धडक एवढी भीषण होती की, ऑटो मध्ये प्रवास करणारे पूजा वाकोडे (१७), प्रज्ञा वाकोडे (१६) , पद्माकर दांडगे (६०) हे मृत झाले. तर सहदेव वाकोडे (५२) , करुणा वाकोडे( १९) रंजिता दांडगे (४०), फुलन वाकोडे (४९) हे गंभीर जखमी झाले आहे. तर ट्रक चालकांचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी झाला. घटनेतील गंभीर जखमी सहदेव वाकोडे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना नागपूर येते रेफर करण्यात आले. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी घटनास्थळी झाली होती. पोलिसांनी घनस्थळीची बघ्यांची गर्दी कमी करून मार्गावरील वाहतूक पूर्वरत केली.

# राज्यस्तरीय जातनिहाय जनगणना परिषदेचे आयोजन

## १ ते ७ जानेवारीदरम्यान जनजागृती सप्ताह

**दि२८ विदर्भ प्रजासत्ताकनांदगाव खंडेश्वर** :अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलन व भारतीय खेत मजदूर युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे ७ जानेवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय जातनिहाय जनगणना परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. १ जानेवारी ते ७ जानेवारीदरम्यान राज्यस्तरीय जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला अमरावती जिल्ह्यातून बहुसंख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

परिषदेचे संयोजक प्रा. डॉ. राम बाहेती, महादेव खुडे, शिवकुमार गणवीर, नामदेव चव्हाण, मधुकर खिल्लारे, फिडेल चव्हाण, संजय मंडवघरे, भीमराव गवई, लता भिसे सोनवणे, दादाराव पटेकर, उदय चौधरी, दिलीप तायडे आदी उपस्थित राहणार आहेत. राज्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती व इतर समाज घटकांची जातनिहाय जनगणना करून आर्थिक व सामाजिक स्थितीचीदेखील गणना करण्याची आवश्यकता आहे, अनुसूचित जाती जमातीला अर्थसंकल्पामध्येत्यांच्या लोकसंख्येनुसार आर्थिक आरक्षण देण्याची गरज आहे. याबाबतदेखील जनजागृती करण्यात येणार आहे.

या जनजागृती सप्ताहात सर्वसामान्य जनतेने बहुसंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य उपाध्यक्ष संजय मंडवघरे, प्रा. प्रसेनजित तेलंग, भाकपचे जिल्हा सचिव सुनील मेटकर, शाहिर धम्मा खडसे, संजय वानखडे, ज्ञानेश्वर मेश्राम, जयेंद्र भोगे, राहुल राउत, सुनिता रायबोले, प्रतिभा मेश्राम, सुरेश शंभरकर, अमोल स्थुल, हनुमान शिंदे, बाबाराव इंगोले, शिरिष शेडमाके आदींनी केले आहे.

# देशातील पहिला मध महोत्सव महाराष्ट्रात

## मुंबईत १८ व १९ जानेवारी रोजी आयोजन

**दि. २७विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** मध उद्योगाची व्याप्ती वाढावी, ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळावी आणि मध माशा पालनाबाबत लोकांना माहिती व्हावी या उद्देशाने देशातील पहिलाच 'मध महोत्सव– २०२४' महाराष्ट्रात आयोजित करण्यात येत आहे. त्याचे पहिले आयोजन मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे १८ व १९ जानेवारीला होत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी दिली. फोर्ट येथील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामीण मंडळाच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन जगताप, सहायक अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

श्री. साठे म्हणाले की, मधमाशी ही केवळ मध व मेण एवढ्या पुरतीच मर्यादित नसून मोठ्या प्रमाणात परागीभवनाद्वारे शेती उत्पादनात वाढ करते. मधमाशा हा निसर्गाचा महत्त्वपूर्ण घटक असून याचा थेट संबंध ग्रामीण अर्थकारणाशी जोडलेला आहे. देशातील पहिले मध संचालनालय १९४६ मध्ये महाबळेश्वर येथे स्थापन करण्यात आले. महाराष्ट्राची प्रेरणा घेऊन केंद्र शासनाने मध संचालनालय सुरु केले. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मधाचे उत्पादन वाढण्यासाठी विविध योजना राबविते. यामध्ये प्रामुख्याने 'मध केंद्र योजना' तसेच 'मधाचे गाव' या नाविन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश आहे. मधमाशापालनातील उपउत्पादने जसे पराग, मेण, रॉयल जेली, प्रोपोलिस, मधमाशांचे विष इत्यादी उत्पादनांची माहिती व विक्रीसाठी मधमाशा पालन उद्योगाचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. त्यात मधाबरोबर मध, मेण यापासून तयार करण्यात आलेले उपउत्पादने व त्यांची निर्मिती करणाऱ्या राज्यातील विविध मधपाळांचे किमान २० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. मुंबईत होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर या महोत्सवाचे मुख्य आकर्षण असणार आहेत.

राज्यातील मधाचे वाढते क्षेत्र लक्षात घेता, मध महोत्सवाच्या माध्यमातून मधक्रांतीची पायाभरणी या महोत्सवाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. दोन दिवसांच्या या मध महोत्सवात मधमाशांचे जतन, संवर्धन आणि संरक्षण याबाबत परिसंवाद, शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, शरीर स्वास्थ आणि मध, मधाच्या गावातील लोकांचे अनुभव कथन इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र हे भारतातील मधाचा सर्वात जास्त हमीभाव देणारे राज्य असून राज्यात प्रति किलो पाचशे रुपये हमीभाव देण्यात येतो. त्याचबरोबर मधपाळांची माहिती संकलन करण्याची योजना सुद्धा राबविण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात १०७९ गावांमध्ये ४ हजार ५३९ मधपाळ शेतकरी मधमाशांच्या सुमारे ३२ हजार पेट्यांमधून मध उत्पन्न करीत आहेत. गेल्या वर्षी १ लाख ६० हजार मध उत्पादन झाले. त्याचे मूल्य २६९ लक्ष रुपये होते, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**देशाच्या सीमांवर होणार मधमाशांचा वापर–** मधमाशा ह्या त्यांना इजा पोहोचविल्यास समोरच्यावर हल्ला करुन त्याला जखमी करतात. मधमाशांच्या या वैशिष्ट्याचा वापर आता देशाच्या सीमेवर शत्रूला रोखण्यासाठी करण्यात येणार असल्याचे श्री. साठे यांनी सांगितले. त्याचबरोबर मधमाशांचे विष हे दुर्धर आजारावर सुद्धा उपयुक्त आहे, याची माहिती लोकांना नाही. त्यामुळे मधमाशांचे विष काढण्याचा भविष्यातील ड्रीम प्रोजेक्ट सुरु करण्याचा मानस असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला म्हणाल्या की, मधुबन हा महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग विभागाचा मधाचा ब्रँड आहे. मध शरिरासाठी अतिशय उपयुक्त आहे. आरोग्यासाठी मधाचा उपयोग, मध निर्मिती, या विषयात काम करणारे अनेक तज्ज्ञ आणि पहिल्यांदाच न बघितलेले, न अनुभवलेले मधाचे वैविध्यपूर्ण जग या महोत्सवाच्या माध्यमातुन लोकांना अनुभवता येणार आहे. त्याचबरोबर मधपाळ, शेतकरी यांच्यासाठी मधपालन कसे करायचे याचे प्रशिक्षण सुद्धा देण्यात येणार आहे.

# "है तैयार हम महारॅली" करिता माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख व शहराध्यक्ष बबलु शेखावत यांच्या नेतृत्वामध्ये ३०० वाहनांसह हजारो काँग्रेसी नागपूर रवाना

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने आपल्या गौरवशाली इतिहासाची १३८ वर्ष पूर्ण केली आहेत. अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली दि. २८ डिसेंबर २०२३ रोजी आपण १३९ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.दि. २८ डिसेंबर २०२३ रोजी १३९ वा काँग्रेस स्थापना दिन राष्ट्रीय स्तरावर मोठ्या उत्साहात साजरा करण्याबाबत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने निर्णय घेतला असून नागपूर येथे राष्ट्रस्तरीय है तैयार हम या महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने या ऐतिहासिक महारॅलीच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीला दिली असून,ती सर्वांसाठी आनंदाची, अभिमानाची व भूषणावह बाब आहे.या महारॅलीला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा.मल्लिकार्जून खरगे,काँग्रेस नेत्या काँग्रेस संसदीय दलाच्या अध्यक्षा खा. श्रीमती सोनियाजी गांधी,काँग्रेसचे नेते खा.श्री. राहुलजी गांधी,मा. श्रीमती प्रियांकाजी गांधी,देशातील काँग्रेस पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते व राष्ट्रीय पदाधिकारी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.महारॅलीला निघताना है तैयार हम डिझाईनचा स्टिकर व पक्षाचा झेंडा आपल्या-आपल्या वाहनावर लावण्यात आला.३०० वाहनांच्या ताफ्यासह शहरातुन हजारो पदाधिकारी व कार्यकर्ते अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर,प्रदेश चिटणीस आसिफ तवक्कल यांच्या उपस्थिती आज दिनांक २८ डिसेंबर २०२३ रोजी नागपूर करिता रवाना झाले.राहुल गांधी सोनिया गांधी काँग्रेस पक्षाचा विजय असो सकाळी ८:०० वाजता पासूनच नेहरू मैदान येथे झुंडच्या झुंड गर्जना देत कार्यकर्ते नागपूर महारॅली सहभागी होण्यासाठी नेहरू मैदान येथे जमा होऊन नागपूर येथे रवाना झाले.



## 'डॉक्टरेट'वरून टीका करणाऱ्यांना फडणवीसांनी दिले एका वाक्यात प्रत्युत्तर

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अकोला**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना जपानच्या कायोसन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेटची पदवी प्रदान करण्यात आली. यावरून विरोधकांनी देवेंद्र फडणवीसांवर टीका केली. त्याला फडणवीसांनी एका वाक्यातच सडेतोड उत्तर दिले 'ठिक आहे, टीका करणारे तेच काम करीत असतात, त्यांच्याकडे लक्ष देण्याची फारशी गरज नसते,' अशा शब्दात देवेंद्र फडणवीसांनी टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या 'ग्रोटेक' राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी अकोल्यात आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना प्रत्युत्तर दिले.

ते म्हणाले, 'डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न मिळावा, ही राज्य शासनाची भूमिका आहे. मी स्वत:ही यापूर्वीच केंद्र शासनाला विनंती केली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख हे त्यांच्या कार्यामुळे खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील भारतरत्न आहेत. त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा, ही सगळ्यांचीच इच्छा असल्याने केंद्र शासनाकडे त्यासाठी पाठपुरावा केला जाईल.'

# राम मंदिर झाल्याचा आनंद पण.. बाबरी पडली तेव्हा तिथे केवळ एकच पक्ष होता

## पवारांचा भाजपाला टोला

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नवीन वर्षात २२ जानेवारीला अयोध्येत रामलला भव्य मंदिरात विराजमान होणार आहेत. यासाठी सर्वत्र आनंदाचं वातावरण असून मंदीर ट्रस्टने विविध क्षेत्रातील नामांकित मंडळीला आमंत्रण दिले आहे. प्रभू श्रीरामाची मंदिरात प्रतिष्ठापना होण्यापूर्वी राजकारणही तापू लागलं आहे. सत्ताधारी भाजपा या कार्यक्रमाचे श्रेय घेत आहे, अशी टीका विरोधक करत आहेत. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राम मंदिराच्या मुद्द्यावरून भाजपाला लक्ष्य केलं. अयोध्येत राम मंदिर झालं याचा आनंद असल्याची भावनाही पवारांनी व्यक्त केली. ते अमरावतीत पत्रकार परिषदेत बोलत होते.



राम मंदिर झाल्याचा आनंद आहे. पण, बाबरी पडली तेव्हा तिथे केवळ एकच पक्ष होता, अशा शब्दांत पवारांनी भाजपाला टोला लगावला. तसेच तीन राज्यातील राज्याचा निकाल अपेक्षेमाणं लागला नाही. मात्र, 'इंडिया' आघाडीत लढलो असतो तर निकाल वेगळा लागू शकला असता. आगामी काळात देखील एकत्र लढल्यास यश मिळेल. प्रकाश आंबेडकरांनी 'इंडिया' आघाडीसोबत यावं ही सर्वांचीच इच्छा आहे. यासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. सत्ताधारी भाजपा राम मंदिराच्या नावावरून राजकारण करत आहे की व्यवसाय हे मला माहित नाही, असेही शरद पवारांनी सांगितले.

दरम्यान, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला घवघवीत यश मिळालं. राजस्थानच्या जनतेनं आपली परंपरा कायम राखत सत्ताबदल केला अन् भाजपाच्या हाती सत्तेच्या चाव्या सोपवल्या. पण, छत्तीसगडच्या निकालानं राजकीय पंडितानांही धक्का बसला. भूपेश बघेल यांची प्रचंड लोकप्रियता असताना देखील काँग्रेसचा इथं पराभव झाला. लक्षणीय बाब म्हणजे या राज्यांमध्ये 'इंडिया' आघाडीचं गणित फसलं. मध्य प्रदेशात समाजवादी पक्षानं काँग्रेस विरोधात उमेदवार दिले होते. याचा फटका काँग्रेसला निवडणुकीत बसला. त्यामुळं आगामी काळात प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी 'इंडिया' आघाडीचा भाग होणार का हे पाहण्याजोगे असेल.

# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत घेण्यात आलेल्या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेचा निकाल जाहीर

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीच्या विकासाला चालना मिळावी, संशोधनात त्यांना लिंगभाव दृष्टिकोनाचा उपयोग करता यावा, तसेच नवीन संशोधक कल्पना आणि त्यांचे उपयोजन यांचा तार्किक पद्धतीने आणि सर्जनशील उपयोजन करण्यासाठी विद्यार्थ्यांना यामुळे सहकार्य होऊ शकेल, या दृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेसाठी लिंगभाव आणि संस्कृती, लिंगभाव आणि शिक्षण, लिंगभाव आणि समाज , लिंगभाव आणि आरोग्य, लिंगभाव आणि राजकारण, लिंगभाव आणि साहित्य, लिंगभाव आणि उद्योजकता लिंगभाव आणि सायबर गुन्हे , लिंगभाव आणि विज्ञान / तंत्रज्ञानआणि लिंगभाव आणि अर्थकारण असे दहा विषय देण्यात आले होते. या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेसाठी एकूण पंचवीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील आलेल्या शोधनिबंधांचे परीक्षकाकडून परीक्षण करण्यात आले. त्या आधारे तीन क्रमांक व दोन प्रोत्साहनपर क्रमांक निवडण्यात आले आहेत.







या स्पर्धेत विधी महाविद्यालय, अकोला येथील वृषाली संजय इंदाने यांचा प्रथम क्रमांक आला. दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा येथील ओमप्रकाश अनंतकुमार गवई यांचा द्वितीय क्रमांक आणि अश्विनी समाधान सपकाळ यांचा तृतीय क्रमांक आला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर येथील सादिया अंजुम शेख मन्नान येथील व कै. पुष्पादेवी कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड, जि. वाशीम येथील सतीश लोणकर यांना प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आला.शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेतील सर्व क्रमांकांना ग्रंथ भेट देण्यात येत असुन त्यामध्ये प्रथम क्रमांकाला मौज प्रकाशन गृह, मुंबईद्वारा प्रकाशित आणि डॉ. नीलिमा गुंडी संपादित 'स्त्रीमिती', डायमंड प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व विद्युत भागवत लिखित 'स्त्रीवादी सामाजिक विचार', राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व करुणा गोखले लिखित 'बाईमाणूस' आणि नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्लीद्वारा प्रकाशित व लिआ लेव्हिन लिखित 'मानवी हक्क' हे ग्रंथ, द्वितीय क्रमांकाला डायमंड प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व विद्युत भागवत लिखित 'स्त्रीवादी सामाजिक विचार', राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व करुणा गोखले लिखित 'बाईमाणूस', नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्लीद्वारा प्रकाशित व लिआ लेव्हिन लिखित 'मानवी हक्क' आणि मैत्री प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व मोहिनी कारंडे संपादित 'स्त्रीसक्षमीकरण विविधांगी प्रवास' हे ग्रंथ, तृतीय क्रमांकाला पुणेद्वारा प्रकाशित व करुणा गोखले लिखित 'बाईमाणूस', नशनल बुक ट्रस्ट, दिल्ली द्वारा प्रकाशित व लिआ लेव्हिन लिखित 'मानवी हक्क', मनोविकास प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व रजिया सुलताना लिखित 'रजनी ते रजिया' आणि राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित आणि सुमती देवस्थळेद्वारा लिखित 'सप्तर्षी आणि अरुंधती' हे ग्रंथ भेटतसेच सोबत प्रोत्साहनपर-१ म्हणून डायमंड प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व विद्युत भागवत लिखित 'स्त्रीवादी सामाजिक विचार', राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व करुणा गोखले लिखित 'बाईमाणूस', नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्लीद्वारा प्रकाशित व लिआ लेव्हिन लिखित 'मानवी हक्क' आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूरद्वारा प्रकाशित सुमती लांडे संपादित 'स्त्रीवाद' आणि प्रोत्साहनपर-२ म्हणून राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित व करुणा गोखले लिखित 'बाईमाणूस', नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्लीद्वारा प्रकाशित व लिआ लेव्हिन लिखित 'मानवी हक्क' आणि राजहंस प्रकाशन, पुणेद्वारा प्रकाशित आणि सुमती देवस्थळे द्वारा लिखित 'सप्तर्षी आणि अरुंधती' या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथील सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. माया एस. वाटाणे यांनी केले.

# महिला महाविद्यालयाद्वारा जिल्हास्तरीय स्पर्धेचे सफल आयोजन

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथील संगीत विभागाद्वारे नेहमीच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. या शृंखलेत महाविद्यालयातर्फे कनिष्ठ आंतर महाविद्यालयीन जिल्हास्तरीय मराठी, हिंदी सुगम गीत गायन कराओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेची पहिली फेरी दिनांक २३-१२-२०२३ ला महाविद्यालयातील नवीन प्रेक्षागृहात पार पडली. या स्पर्धेचे अध्यक्ष महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील तसेच उद्घाटक प्रा. ममता पांडे (सहसचिव, नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती) उपस्थित होते. या स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकूण ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला. यापैकी माही गिरे , हिमांशी शीष्टे , संवेदना नवले ,कावेरी शोभणे ,स्वरमयी चौधरी, वसुंधरा ईखार , रमाई खरे , प्रतिका कांडलकर ,निधी अहेरवार या ९ स्पर्धकांची २०/०१/२०२४ ला होणाऱ्या महाविद्यालयीन स्नेह संमेलनात होणाऱ्या स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

उद्घाटनपर संभाषणात प्रा. ममता पांडे यांनी संगीत विभागातील उपक्रमाचे गुणगौरव करून याच महाविद्यालयातून इंडियन आयडॉल झालेली अमरावतीची सुकन्या वैशाली माडे तसेच महाराष्ट्र आयडॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड झालेली श्रुती जैन या विद्यार्थिनींचे कौतुक करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय संभाषणामध्ये प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी महाविद्यालयामध्ये संगीत विभागाद्वारे होणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देऊन महिला महाविद्यालयात ११ वी ते पीएच.डी. पर्यंतचे संपूर्ण शिक्षण तज्ञ प्राध्यापकांद्वारे दिले जाते तसेच विद्यार्थिनींना आकाशवाणी, नेट, सेट, विविध सर्टिफिकेट कोर्सेस करिता मार्गदर्शन केले जाते असे मत व्यक्त केले.

या स्पर्धेचे परीक्षण महिला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. स्वामिनी सहारे(अमरावती आयडॉल) सौ. प्रणिता पाठक, सौ. हर्षा छाबडा यांनी केले. या स्पर्धेचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची एम. ए. भाग दोन ची विद्यार्थिनी कु. ऋषिका पिंगळे हिने केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शर्मिला देशमुख यांनी केले. या प्रसंगी संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ. स्नेहाशिष दास यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्पर्धेतील सर्व स्पर्धकांना संगीत कलेतील तत्त्व, सादरीकरण कौशल्य ,मायक्रोफोन टेक्निक्स, भाषा सौंदर्य, प्रत्येक गायकाची व्यक्तिगत स्केल तसेच आवाज गुणधर्मानुसार योग्य गाण्यांची निवड कशी करावी यावर मार्गदर्शन केले. तसेच ज्या स्पर्धकांना या संदर्भात मार्गदर्शनाची आवश्यकता असेल तर महिला महाविद्यालयातील संगीत विभागाचे दालन त्यांच्यासाठी नेहमीच खुले आहे असे सांगितले. स्पर्धेचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

प्रस्तुत स्पर्धेच्या आयोजनाकरिता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणी सदस्यांनी संगीत विभागाचे कौतुक केले. प्रस्तुत स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ. स्नेहाशिष दास, प्रा. डॉ. अंकुश गिरी, प्रा. डॉ. जयश्री वैष्णव, प्रा. डॉ. शर्मिला देशमुख, प्रा. डॉ. महेंद्र बोडे, प्रा. अजय महल्ले, प्रा. डॉ. अर्चना काळे, प्रा. डॉ. दीपक चौधरी यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेकरिता महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी तसेच विविध महाविद्यालयातील प्राध्यापकही उपस्थित होते.

# २८ हजार मतदार वगळले; ३३ हजार नव्या मतदारांची भर

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभाग सज्ज झाला असून सध्या पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. यामध्ये बोगस मतदारांच्या नावांवर कात्री तर नवमतदारांकरिता विविध शिबिर आयोजित केले जात आहे. त्यामुळे दोन महिन्यांत ३३ हजार मतदारांची भर पडली असली तरी २८ हजार मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात मतदारयादीमध्ये ५ हजार मतदारच वाढले आहेत. ३३ हजारांमध्ये १० हजार नवमतदारांचादेखील समावेश आहे. १ जानेवारी २०२३ च्या अंतिममतदारयादीमध्ये पुरुष मतदारसंख्या १२ लाख ३८ हजार ४४, महिला मतदार संख्या ११ लाख ६२ हजार ५३६ व तृतीयपंथी ८२, सर्व्हिस व्होटर ३ हजार २८९ असे एकूण २४ लाख ६६२ होती. तर २७ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेल्या प्रारूप मतदार यादीतील पुरुष मतदार संख्या १२ लाख ३३ हजार ३७८ आहे. महिलांची संख्या ११ लाख ५९ हजार १५७ तर तृतीयपंथी ८२, सर्व्हिस व्होटर ३ हजार २८९ असे एकूण मतदार संख्या २३ लाख ९२ हजार ६१७ आहे. यामधून ३६ हजार ७१७ मतदारांना वगळण्यात आले होते. दरम्यान, निवडणूक विभागाकडून दैनंदिन मतदारांची नावे समाविष्ट करणे तसेच विविध शिबिरांचे आयोजन सुरू असल्याने मतदारांनी याला प्रतिसाद दिल्याने या दोन महिन्यांत ३३ हजार मतदार वाढले आहेत.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे बालसंगोपन केंद्राचा उद्घाटन सोहळा संपन्न

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे बालसंगोपन केंद्राचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या शुभहस्ते २७ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्याला रूग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ, माजी अधिष्ठाता डॉ. क्रिष्णा विल्हेकर, विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा काळे, डॉ. सतीश तिवारी, डॉ. अजय डफळे व हॉस्पिटल मॅनेजर डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, नर्सिंग सुपेरिंटेंडेंट व इनचार्ज सिस्टर्स उपस्थित होते. आहारतज्ञ व इनचार्ज बालसंगोपन केंद्र डॉ. उज्वला ढेवले यांनी बालसंगोपन केंद्राची रूपरेषा सांगितली तर अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी उद्घाटन पर भाषणातून बालसंगोपन केंद्राची संकल्पना विषद केली. ही सुविधा रूग्णालयातील कर्मचा-यांच्या पाल्यांसाठी करण्यात आलेली असल्याचे सांगितले.



कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व नर्सिंग स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शरद पवार यांची शंकर बाबा पापळकर यांच्या आश्रम शाळेला भेट

## विद्यार्थ्यांनी शरद पवार यांच्यावर फुले उजळून केले स्वागत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते पवारांनी घेतला चहापान



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अचलपुर**

शरद पवार हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आज अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथील शंकर बाबा पापळकर यांच्या मतिमंद बेवारस आश्रम शाळेला भेट दिली असता संपूर्ण आश्रम शाळेची पाहणी यावेळी शरद पवार यांनी स्वतः केली. यावेळी विद्यार्थ्यांनी शरद पवार यांच्यावर फुलांची उधळण करत स्वागत केलं.त्यांनंतर शरद पवार यांनी मतिमंद बेवारस मुलांच्या समस्या जाणून घेतल्या,अठरा वर्षानंतर बेवारस मतिमंद मुलांचं भवितव्य उज्वल व्हावं यासाठी शंकर बाबा पापडकर यांनी शरद पवार यांना निवेदन दिले व याकडे लक्ष दिले पाहिजे अशी मागणी केली असता तुम्ही आम्हाला हक्काने सांगा आम्ही तुमची मदत करू असं वक्तव्य शरद पवार यांनी यावेळी केलं तर तुम्ही दिलेले निवेदन हे सरकार दरबारी पोहोचू असेही शरद पवार यांनी यावेळी सांगितलं यावेळी अंध विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत म्हणत शरद पवारांचा स्वागत केलं होत.यावेळी आमदार अनिल देशमुख माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यासह अनेक मिती उपस्थित होते.

# रब्बीतील हिरव्यागार पिकांनी बहरले शेतशिवार : थंडी पिकांसाठी लाभदायक

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

खरीप हंगाम आटोपताच शेतशिवारात रब्बी हंगामात विविध धान्य, कडधान्य पिकांसह गहू पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. सध्याचे पोषक वातावरण रब्बी पिकांसाठी अनुकूल व फायदेशीर ठरत आहे.



लाखनी तालुक्यातील किटाडी व परिसरातील शेतशिवारात कोरडवाहू क्षेत्रात रब्बी हंगामात लाख, लाखोरी, मोहरी, उडीद, जवस, हरभरा, वाटाणा, कोथिंबीर आदी पिकांची लागवड केलेली आहे तर, बहुसंख्य शेतकरी गहू पिकाला अधिक महत्त्व देत आहेत. याशिवाय, सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी शेतशिवारात उन्हाळी हंगामातील धान पिकांचे पन्हे भरलेले असून, अंकुरलेल्या पन्हयांची थोडीफार वाढ झाल्याचे दिसून येत आहे.खरिपानंतर शेतकऱ्यांची आता रब्बीवर मदार आहे. खरिपाच्या तुलनेत रब्बीचे क्षेत्र अत्यल्प असले तरीही निश्चितच चांगले उत्पादन होईल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. हिवाळ्यातील वाढती थंडी रब्बी पिकांसाठी लाभदायक ठरत आहे. नियमितपणे थंडीचा जोर कायम आहे.

परिणामी, रब्बी हंगामातील पिकांसाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. थंडी व पोषक वातावरणामुळे रब्बी हंगामात पेरणी केलेली विविध कडधान्य पिके तरारली असून, डौलदार दिसायला लागली आहेत. काही शेतकऱ्यांनी आपल्या नियोजनबद्ध शेतीकामात व्यस्त राहून अगोदरच पेरणी उरकल्यामुळे त्यांच्या शेतातील रब्बी पिके जोमाने वाढत असून हिरवीगार दिसत आहे.

### रात्री करावे लागते शेतात जागरण

किटाडी परिसर जंगलव्याप्त असून, हिरव्या गर्द वनराईने नटलेला आहे. सभोवताली जंगल असल्याने शेतशिवारात रात्रीला वन्यप्राण्यांचा मुक्त संचार आहे. आता रब्बी पिके छानपैकी बहरायला सुरुवात झाली आहे. रात्रीला वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्याकरिता शेतकऱ्यांनी शेतातच मचाण उभारले आहे. रात्रीला मचाणावर चढून शेतकरीवर्ग कडाक्याच्या थंडीत कुडकुडत पिकांचे रक्षण करीत आहे. शेतातील पिके वाचविण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून जागरण करावे लागत आहे.

# सुतार व्यवसायावर बेरोजगारीची कुऱ्हाड

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

पूर्वी शेतीसाठी लागणाऱ्या कृषी साहित्यांसाठी शेतकरी सुतारांकडे धाव घेत होते. मात्र, आता लाकडी अवजाराऐवजी रेडीमेड मिळणारी लोखंडी अवजारे उपलब्ध झाल्याने सुतारांच्या व्यवसायावर बेरोजगारीची कुर्हाड चालली आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात ग्रामीण भागातील बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. ही पद्धती काळाच्या ओघात लुप्त पावत चालली आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक खेडेगावात बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार होते. बलुतेदार व अलुतेदार गावातील शेतकऱ्यांनी वर्षभर सेवा पुरवत असून त्यां मोबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून मोबदला म्हणून धान्य मिळत होते. परंतु, यांत्रिक युगाचा प्रारंभ झाल्यापासून शेतीमध्ये लागणाऱ्या लाकडी अवजाराऐवजी कारखान्यातूनच रेडीमेड मिळणारी लोखंडी अवजारे उपलब्ध होत असल्याने बारा बलुतेदारामध्ये समाविष्ट असलेल्या सुतारांच्या व्यवसायावर पाणी फेरले आहे. सुतार कुटुंबीयांचे संपूर्ण जीवन हे त्यांच्या कला कौशल्यातून घडविलेल्या विविध लाकडी वस्तूंच्या मिळकतीतून घडविले जात असे.बैलगाडी, भोवरी, वखर, डवरा शहरात उपलब्ध होत आहेत. त्यामुळे एकेकाळी १२ बलुतेदार महत्वाचा मानला गेलेला सुतार व्यवसाय करणाऱ्या सुतारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

# ब्राह्मण उद्योजकांची आंतरराष्ट्रीय परिषद नाशिकला

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ची ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद ४ फेब्रुवरी २०२४ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. व्यवसाय वृद्धी आणि ज्ञान वृद्धी साठी ही परिषद ओळखली जाते. अनेक नामवंत वक्ते व शेकडो व्यवसायिक भारताच्या तसेच भारत बाहेरील अनेक शहरातून यासाठी उपस्थित राहतात.ब्राह्मण व्यवसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (बीबीएनजी ) तर्फे ८ वी आंतरराष्ट्रीय परिषद परिवर्तन ४ फेब्रुवारी २०२४ रोजी नाशिक येथील गुरुदक्षिणा हॉल येथे होणार असल्याची माहिती बीबीएनजी चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी दिली .उद्योजकाचे देशाच्या विकासात मोलाचे योगदान असून देशाचे अर्थकारण व रोजगार निर्मितीमध्ये देखील उद्योजकांची महत्वाची भूमिका असते. या परिषदेचा उद्देश व्यवसायाच्या वाढीसाठी विचारमंथन, गुंतवणूकदारांच्या बैठका, खास आयोजित केलेल्या इ२इ मीटिंग्ज, बिझनेस इंटरएक्टिव्ह सेशन्स, नामवंत व्यावसायिकांचे मार्गदर्शन आणि विविध उद्योजकांशी थेट संवाद असा आहे.गेली ८ वर्षापासून ही परिषद देशातील प्रमुख शहरात आयोजित करण्यात येते. नाशिक पासून सुरू झालेल्या या परिषदेचे आयोजन करण्याचा मान या वर्षी नाशिक ला मिळाला आहे.या परिषदेला दिग्गज अतिथी व वक्ते उपस्थित रहाणार आहेत – श्री. सुनील देवधर (राज्य सहप्रभारी, भारतीय जनता पार्टी, आंध्र प्रदेश), श्री. रवींद्र साठे ( खादी व ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष), श्री. विष्णू मनोहर (प्रसिद्ध चेफ), श्री. विश्वास पाठक (संचालक, महावितरण),डॉ. अशोक जोशी (अमेरिका लिथेनियम बॅटरी मधील ३०० पेटंट हॉल्डर), डॉ. विजय जोशी (ऑस्ट्रेलिया मध्ये 'शिलूलश्रश वस्तू वापरून रस्ते विकास), डॉ. संजय पैठणकर (दुबई), श्री. आनंद गानू (अमेरिकेतील गर्जे मराठीचे संस्थापक), उद्योजिका अलिका किर्लोस्कर, उदय निरगुडकर, गिरीश चितळे, रवींद्र प्रभुदेसाई, असे जगभरातील आपापल्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीं उपस्थित राहणार आहेत.उद्योजकीय कौशल्यांचे प्रदर्शन – या एकदिवसीय परिषदेत, उद्यम कौशल (ब्राह्मण शार्क टँक), उद्यम कौस्तुभ अवॉर्ड शो आणि विविध उद्योजकांना भेटण्याच्या आणि नेटवर्कच्या संधींद्वारे नवनवीन उत्पादनांचे लॉंचिंग, उद्योजकीय कौशल्यांचे प्रदर्शन होणार आहे. परिषद यशस्वी होण्यासाठी परिवर्तन परिषदेचे प्रमुख डॉ. अभिजीत चांदे, मुकुंद कुलकर्णी, संजय लोंढे, मधुरा कुंभेजकर, अरविंद कोर्हाळकर, सुयोग नरवणे, महेश देशपांडे, नितीन बेळे, डॉ. संदीप चिंचोलीकर, अक्षय जळगांवकर, रसिका कुलकर्णी, महेंद्र एकबोटे, जगदीश कुलकर्णी, पूनम शुक्ल, अमोल अबोटी, वैशाली सायंदे, श्रेयस कुलकर्णी, गौरव खिस्ते, हिमांशू कुलकर्णी तसेच सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. आपल्या सर्वांच्या आर्थिक समृद्धी साठी – आणि आपल्या देशाच्या प्रगतीसाठी चला ४ फेब्रुवारीला एकत्र येऊया !!

# कामाचे पैसे वेळेत मिळणार मजुरांचा हजेरीपट गावातच

## रोजगार सेवकांच्या पंचायत समितीला जाण्याच्या चकरा होणार कमी



**अरुण जोशी**

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पंचायत समितीवर होणारीरोजगार हमी योजनेची कामे आता ग्रामपंचायत स्तरावर होणार आहेत. रोजगार हमीवरील मजुरांचा हजेरीपट ग्रामपंचायत स्तरावर होणार आहे. त्यामुळे आता रोजगार हमी योजनेवरील कामाचे पैसे वेळेत मिळणार आहेत.

रोजगार हमी योजनेंतर्गत कामगारांनी ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी केल्यानंतर ग्रामपंचायत ते मागणी अर्ज पंचायत समिती किंवा तहसीलकडे नेऊन द्यायची. त्यानंतर पंचायत समिती स्तरावर हजेरीपट जनरेट केल्यानंतर ते परत नेत होते. मात्र, आता ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने पू शासनाने ग्रामपंचायतींनाच हजेरीपट न जनरेट करण्याचे अधिकार दिले दे आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतींना जनरेट म झालेला इ-मस्टर परत नेण्यास पंचायत समितीला जाण्याची गरज नाही. ते सरळ तिथूनच प्रिंट काढू शकणार आहेत. त्यामुळे कामावरच हजेरीपत्रक मिळणार असून ग्रामपंचायत ते पंचायत समितीचा प्रवास कमी झाला आहे.

### आधी तालुक्याला यासाठी जावे लागायचे

पूर्वी ग्रामपंचायतीला मागणी अर्ज, नमुना चार पंचायत समितीला नेऊन देण्यासाठी तहसीलला जावे लागायचे. मात्र आता हा प्रवास बंद होणार आहे.

### केलेल्या कामाचा मोबदला वेळेत मिळणार

आता रोजगार हमीवरील मजुरांचा हजेरीपट ग्रामपंचायत स्तरावरच तयार होणार आहे. त्यामुळे कामाचा मोबदला वेळेत मिळणार आहे.

### रोहयोवरील मजुरांचा हजेरीपट आता गावातच

पूर्वी रोहयो मजुरांचा नमुना नंबर चार पंचायत समितीला नेऊन द्यावे लागायचे. तेव्हा हजेरीपट तयार केले जायचे. मात्र, आता ग्रामपंचायत स्तरावर हजेरीपट उपलब्ध राहणार असल्याने त्याचा हजेरीपट गावातच तयार करण्यात येणार आहे.

# ‘उद्धव ठाकरे’ वगळता मुंबईतील ३५० निमंत्रीतांची यादी तयार; ‘राज ठाकरें’चंही नाव

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी देशभरातील हजारो प्रतिष्ठित नागरिकांना निमंत्रित करण्यात आले आहे. मुंबईतून ३५० निमंत्रितांची यादी तयार करण्यात आली आहे. परंतु या नावांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नावाचा समावेश नाही, राज ठाकरे यांना निमंत्रित करण्यात आले असल्याच्या चर्चा आहेत. ३५० निमंत्रित नावांच्या यादीत राज ठाकरे यांच्या नावाचा समावेश असल्याचं, म्हटलं जात आहे.

बाबरी मशीद पाडल्यानंतर हिंदुत्ववादी नेते आणि कार्यकर्त्यांना अटक होत असताना बाबरी मशीद पाडण्यासाठी शिवसैनिकांना जबाबदार धरण्यात आले. तेव्हा बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते, ‘माझ्या शिवसैनिकांनी बाबरीचा ढाचा पाडला असेल तर मला त्यांचा अभिमान आहे.’ रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाच्या प्रदीर्घ संघर्षानंतर आता अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन होत असताना बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निमंत्रित करण्यात आलेले नाही.



भाजप नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी उद्धव ठाकरेंना थेट प्रश्न केला आहे की, राम मंदिराच्या उभारणीत ठाकरे गटाचे योगदान काय? सरकारच्या व्हीव्हीआयपी यादीत उद्धव ठाकरे यांचे नाव नाही, त्यामुळेच त्यांना उद्घाटन समारंभाचे निमंत्रण देण्यात आले नाही. या सोहळ्यासाठी सुमारे साडेआठ हजार लोकांना निमंत्रणे देण्यात आली आहेत. राम मंदिराच्या उभारणीत उद्धव ठाकरेंचे कोणतेही योगदान नाही, हे देशातील जनतेला माहीत आहे. केंद्र सरकारच्या व्हीव्हीआयपी यादीत उद्धव ठाकरेंचे नाव नाही. मात्र, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना राम मंदिर उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आल्याची चर्चा आहे, मात्र याला दुजोरा मिळालेला नाही.

त्यावर ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषद सदस्य सचिन अहिर म्हणाले की, आम्हाला निमंत्रण मिळो अथवा न मिळो, राम मंदिर हा आमच्या श्रद्धेचा विषय आहे. जे आज राम मंदिराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करत आहेत, ते त्यावेळी पळून गेले होते, अशी टीका अहिर यांनी केली.

# विद्यापीठात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर गणित विभागात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू तथा विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, प्रमुख अतिथी म्हणून अभ्यास मंडळ सदस्य व चिखलदरा येथील सिपना विज्ञान महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख डॉ. व्ही.आर. पाटील, डॉ. एस.एस. शेरेकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. एस.एस. शेरेकर यांनी गणित तज्ज्ञ श्रीनिवास रामानुजम यांचे गणितातील योगदान, नवीन अभ्यासक्रमात होणारे बदल आदींबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डुडुल यांनी गणित विषयाचे महत्व, नवनवीन शोध, खगोलशास्त्र याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच प्रमुख वक्ते डॉ. व्ही.आर. पाटील यांनी गणित विषयात संशोधनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. संचालन कु. बी.डी. देशमुख, आभार कु. आनंदी धुर्वे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता श्री ए.पी. निळे, श्री ए.आय. देठे, श्री डी.पी. राठोड, श्री शोएब अख्तर, श्री एस.के. राठोड, श्री मनिष देशमुख यांनी परिश्रम घेतले.

# बच्चू कडू मविआत जाण्याच्या चर्चा मात्र शरद पवारांकडून चर्चेला पूर्णविराम

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार कोसळून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार स्थापन झाले. मात्र या सरकारमध्ये सामील झालेले माजी मंत्री बच्चू कडू यांना मंत्रीपदा अद्यापही मिळाले नाही त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून बच्चू कडू सरकारविरुद्ध आक्रमक झाल्याचे वारंवार बघायला मिळत आहे. त्यातच, आता महाविकास आघाडीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही बच्चू कडूंचे निमंत्रण स्वीकारल्याने काही राजकीय प्रश्न उपस्थित झाले आहेत.



यासंदर्भात स्वत: शरद पवार यांनी खुलासा केला आहे.

एखाद्या विधानसभा सदस्याने त्याच्या मतदारसंघात गेल्याने चहासाठी बोलावल्यावर जायला पाहिजे ही आपल्या महाराष्ट्राची राजकीय संस्कृती आहे. त्यांनी जाता-जाता माझ्याकडे चहासाठी येण्याचे निमंत्रण दिले. ते निमंत्रण मी स्वीकारले असून तिथे जात आहे. मात्र, या भेटीमागे कुठलाही राजकीय उद्देश नाही. बच्चू कडू महायुतीत नाराज आहेत, ते महाविकास आघाडीत येणार असतील तर तुम्ही त्यांना घ्याल का, असा प्रश्न शरद पवारांना विचारण्यात आला. त्यावर, कशावरुन, तुमच्याकडे अशी माहिती आहे का? असा प्रतिप्रश्न शरद पवारांनी केला. त्यामुळे, बच्चू कडू महाविकास आघाडीत जातील या प्रश्नावरील चर्चेला शरद पवारांनी पूर्णविराम दिला.